महाराष्ट्र शासन (आदिवासी विकास विभाग)
**सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण, मौजे मानूर, ता.कळवण, जि. नाशिक**
दूरध्वनी क्र. ०२५९२-२५०१०१ Email Id :- poitdp.kalwan-mh@gov.in

**-:: शासकीय वसतिगृह भोजन ठेका ई-निविदा सन २०१८-१९ (प्रथम मुदतवाढ ई-निविदा सूचना प्रसिध्दी) ::-**

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण, जि.नाशिक यांचे अधिनस्थ आदिवासी मुलांचे/ मुलींच्या एकूण २९ शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना **सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी** शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, दि.११.११.२०११, शासन शुध्दीपत्रक दि.१०.४.२०१३ व दि.२९.६.२०१३ मधील आहार प्रणालीनुसार दोन वेळेचे पोटभर जेवण{आठवडयातून एक वेळा (रविवार) मांसाहार व शाकाहारी विद्यार्थ्यांसाठी गोडपदार्थ (स्वीट)}, सकाळचा नाश्ता, दूध, अंडे/बिस्कीट पुडा, ऋतूमानानूसार फळे इ. ठेका पध्दतीने भोजन पुरवठाकामी शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दि.१.१२.२०१६ अन्वये अधिकृत पुरवठाधारकांकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर ई-निविदा प्रक्रियेदरम्यान **खालील वसतिगृह भोजनठेका ई-निविदेस प्रतिसाद** (किमान ३ **निविदा अप्राप्त) प्राप्त नसल्याने प्रथम मुदतवाढ प्रसिध्दीअन्वये** पुन्हा ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | वसतिगृहाचे नाव | भोजनठेका अंदाजित रक्कम रुपये | निविदा अर्ज शुल्क रुपये | बयाणा रक्कम रुपये (EMD) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५७९८ | शास.वगृ. **देवळा (७५ मुले)**, ता.देवळा | २४००००० | ३६०० | ६०००० |

**अटी व शर्ती :-**

१) संपूर्ण निविदा प्रक्रिया ही फक्त ऑनलाईन राहील. इच्छुक निविदाधारकांनी निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणाली संदर्भातील **https://maharashtra.etenders.in** या Portal चे Sub-Portal **https://tribal.maharashtra.etenders.in** वर नोंदणी (enrollment) करणे अनिवार्य आहे. सदरबाबत शंका असल्यास **Sify Technologies Ltd. Nextender India Pvt.Ltd. (Pune) Contact No.**०२०-२३१५५५५५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

२) निविदा सूचना, निविदेचे वेळापत्रक, निविदा अर्ज शुल्क, बयाणा रक्कम, विहीत अटी-शर्ती असा निविदेबाबत सविस्तर तपशील उपरोक्त नमूद वेबपोर्टलवर पाहावयास मिळेल. निविदा अर्ज विक्री व निविदा तयार करणे **(फॉर्म डाउनलोड व बिड प्रिपेरेशन)** कालावधी **दि.४.६.२०१८ ते दि.११.६.२०१८ रोजीपर्यंत** असून निविदा सादर करण्याचा (टेंडर सबमिशन) अंतिम **दि.१३.६.२०१८ रोजीपर्यंत** आहे.

३) ईमेल, फॅक्स, स्पीडपोस्ट किंवा हस्तपोहोच इ. माध्यमांद्वारे तथा निविदा ऑनलाईन स्वीकृती दिनांकानंतर सादर केलेल्या निविदांचा तथा तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही. तसेच निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत निविदा ऑनलाईन सादर न केल्यास (इंटरनेट कनेक्टीव्हिटी-जॅमिंग/ साईटक्रॅश, विद्युतपुरवठा खंड वा संगणक बिघाड इ. कारणांमुळे) सदरबाबत न्यायालयात दाद मागता येणार नाही.

४) ऑनलाईन निविदा नाकारणे अगर स्विकारणे, निविदा मंजूर करणे, त्यामधील अटी व शर्तीमध्ये वाढ करणे किंवा शिथील करणे, निविदा प्रक्रियेत बदल करणे, निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे अथवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार **प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण, जि. नाशिक** यांनी राखून ठेवले आहेत.

**(जाहिरात प्रसिध्दी/ शासनाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता स्वाक्षरीत प्रत)**

**दिनांक :- ४/६/२०१८**

(अशोक घुमरे)
**लेखाधिकारी, प्रकल्प कार्यालय**
**एकात्मिक आदिवासी विकास**
**प्रकल्प कळवण, जि. नाशिक**

Scanned by CamScanner